सद्‌रक्षणाय खलनिग्रहणाय्

दूरध्वनी क्र. ०२२-२२६२०३३२
Email:pressroom.mum@mahapolice.gov.in

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
वार्ताहर कक्ष
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. १६२/ वार्ता.कक्ष /२०२२ | दिनांक : २४ / ०७ / २०२२

# -: प्रेसनोट :-

## कुरार पोलीस ठाणे - प्राणांकित अपघात

दि. २२.०७.२२ रोजी १७:३० ते १७:४० वा. सुमारास फिर्यादी श्री अजय रामउदय साह, वय ४० वर्षे व इसम नामे मनिष जयंतीलाल भालिया, वय ४६ वर्षे हे दोन्ही कामगार ओम त्रिमुर्ती, शिवधाम कॉम्प्लेक्स, ओबेरॉय मॉलसमोर, मालाड पुर्व, मुंबई या बिल्डिंग मधील १०व्या माळयावरील खिडकीला मार्बल बसविण्याचे काम करीत होते. सदर काम संपवुन इसम नामे मनिष जयंतिलाल भालिया घरी जात असताना यातील अटक आरोपीताने नमुद कामाच्या ठिकाणी संरक्षण जाळी बसविलेली नसल्यामुळे व लॉबीमध्ये कमकुवत सळया लावण्यात आल्या असल्यामुळे त्यातुन मनिष भालिया यांचा तोल जावुन ते दहाव्या माळयावरुन खाली पडुन जखमी झाले असता त्यांना औषोधोपचाराकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली पश्चिम, मुंबई येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन दाखलपुर्व मयत घोषित केले व यातील आरोपी त्यांच्या मरणास कारणीभुत झाला म्हणुन फिर्यादीवरून गु.र.क्र. ६२७/२२, कलम ३०४ (अ) भा.द.वि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.